RNI NO - MHMAR/26/A2042

साप्ताहिक

महाविद्यालय खबरबात

MAHAVIDYALAY KHABARBAT

संस्थापक
मुख्य संपादक - डॉ. राजकुमार मा.कोल्हे

डोंबिवली,कल्याण,ठाणे,रायगड,नागपुर येथुन प्रकाशित

संपादक - डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार मा.कोल्हे

■ वर्ष १ ■ अंक ५ ■ गुरुवार , ६ ते १२ ऑगस्ट २०२६ ■ किंमत ३ रुपये ■ पाने ४

जे एम एफ शिक्षण संस्थेत अवतरली संताची मांदियाळी...अवघी दुमदुमली पंढरी...









डोंबिवली (प्रतिनिधी) - देवशयनी एकादशी म्हणजेच आषाढी एकादशी, पंढरपूर मध्ये लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल झालेले असतानाच जन गण मन इंग्रजी माध्यमिक शाळा आणि विद्यामंदिर मध्ये देखील हजारोंच्या संख्येने विद्यार्थी,पालक उपस्थित राहून विठ्ठलाच्या नामघोषात दंग झाले.

जे एम एफ संस्थेचे अध्यक्ष डॉ.राजकुमार कोल्हे, सचिव डॉ प्रेरणा कोल्हे, खजिनदार जान्हवी कोल्हे यांचे जे एम एफ मंडपम मधे आगमन झाले , त्यांचे स्वागत करण्यासाठी सर्व बाल वारकरी विद्यार्थी एकत्र आले. मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल रूक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व आरती करण्यात आली. बाल वारकऱ्यांनी तुळशीचे रोपटे देऊन मान्यवरांचे स्वागत केले.

विठ्ठल रुक्मिणी, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, मुक्ताई, सोपानदेव, अशा अनेक संतांच्या वेशभूषा करून आलेले विद्यार्थी म्हणजे साक्षात संतांची मांदियाळीच अवतरली आहे असे भासत होते.ज्याप्रमाणे विठ्ठलाच्या हृदयात भक्ताचा वास आहे त्याच प्रमाणे आपल्या हृदयात देखील विठ्ठलाचा वास आहे पण त्यापेक्षाही माणुसकीचा ठेवा असणे अधिक गरजेचे आहे, आज लाखो वारकरी अनवाणी पायाने पंढरपूरला चालत जात आहेत त्यांची सेवा करणे किंवा जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा.. .असे संत तुकाराम महाराजांनी सांगून ठेवले आहे ,त्याच भक्तीभावाने सेवा केली तर त्यांच्याच रूपाने विठ्ठल तुम्हाला तिथेच भेटणार आहे असे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांनी आपल्या भाषणात सांगितले तर अप्रतीम वेशभूषा करून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना भेटवस्तू देखील दिल्या.

रोजच्या धावपळीच्या जीवनात आपण आपल्या स्वतःलाच विसरून जात आहोत, म्हणून स्वतःला शोधण्यासाठी अध्यात्माचा मार्ग हा सुलभ आहे, ज्याप्रमाणे भक्त पुंडलिकाने स्वतःला स्वतःमध्ये शोधून त्याच्या भक्तीने पांडुरंगाला प्रसन्न करून घेतले तसे तुम्ही देखील अंतर्मनात असलेल्या प्रश्नांना अध्यात्माच्या आधारे सोडवून त्या परमात्म्याला जवळ करा आणि आनंदी रहा असे सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले आणि देवशयनी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थी दशेत असलेले बालरूप हे निरागस रूप असते, म्हणुनच आज विठ्ठल रुक्मीणी, साधू संतांच्या वेशभूषा मधे आलेले हे विद्यार्थी म्हणजे साक्षात पांडुरंग रुक्मिणचे अंशच दिसत आहेत असे खजिनदार जान्हवी कोल्हे यांनी आपल्या भाषणात म्हटले.संगीत शिक्षिका सौ श्रेया कुलकर्णी व विद्यार्थ्यांच्या तबल्याच्या साथीने सर्व विद्यार्थ्यांनी अभंग सादर केला तर सर्व शिक्षकांनी टाळ मृदुंगाच्या गजरात पावले थिरकली. दिंडी सोहळ्यामध्ये माऊलींची पालखी हे मोठे आकर्षण होते सर्व च जण उत्साहात ब्रह्मनादात सहभागी झाले होते. शिशु विहारच्या बालकांनी पांडुरंगाची गाणी गाऊन रिंगण सोहळा केला . याची देही याची डोळा पाहिला माऊलींचा सोहळा ..सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी भक्ती भावाने सेवा करून आषाढी एकादशीचा सोहळा पार पाडला तर नितेश मेस्त्री यांनी पांडुरंगाचे चित्र रेखाटन केले व नरेश पिसाट यांनी सजावट केली.अभिषेक देसाई, प्रमोद पगारे,सौ. मयुरी खोब्रागडे ,यांचे सहकार्य लाभते तर कार्यक्रमाचे फोटो व्हिडीओ काढण्याची ची जबाबदारी अखिल नायडू, जय लखारा, निखील शिंदे, तांडुलकर, त्यांच्या चमूने पार पाडली.

डॉ राजकुमार एम कोल्हे, संस्थापक अध्यक्ष व डॉ सौ प्रेरणा राजकुमार कोल्हे सचिव, जाह्नवीज मल्टि फाऊंडेशन तर्फे सर्व जे एम एफ परिवाराला

गुरु पूर्णिमा च्या हार्दिक शुभेच्छा ..

जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये व्यास गुरुपौर्णिमा निमित्ताने

27 जुलै ते 1 ऑगस्ट,2026 सप्ताह आंतरशालेय विविध स्पर्धांचे आयोजन

डोंबिवली-

सा कला या विमुक्तये..म्हणजेच कला ही सर्व बंधनातून मुक्त करते.प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंतर्बाह्य कला गुणांना वाव मिळावा म्हणून दरवर्षी व्यास पौर्णिमा चे औचित्य साधून जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये आंतरशालेय विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते, ह्यावर्षी देखील दिनांक २७ जुलै ते 1 ऑगस्ट पर्यंत संपूर्ण सप्ताह अनुक्रमे बुद्धिबळ स्पर्धा, समूह गायन, थिंक टँक, वेशभूषा आणि समूह वेशभूषा स्पर्धा, बालनाट्य आणि ऐतिहासिक नाटक, चित्रकला, व समूह नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धांसाठी जवळपास तीन ते चार हजार आंतरशालेय विद्यार्थी सहभागी झाले होते.

शिशुविहार ते इयत्ता दहावी पर्यंतच्या सर्वच विद्यार्थांनी प्रत्येक विषयात हिरीरीने सहभाग दर्शवून बक्षिसे पटकावली. प्रथम दिनापासून च संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे, सचिव डॉ प्रेरणा कोल्हे, आणि इतर पदाधिकारी , परीक्षक,यांच्या हस्ते दीप प्रज्वलन ,सरस्वती आणि व्यासपूजन करून स्पधेर्ची सुरुवात झाली होती. (पान ३ वर)

FASHION SHOW COMPETITION







संपादकीय

नशामुक्त भारत :

प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी

भारत हा जगातील सर्वात युवा देश मानला जातो. ही युवा शक्ती देशाच्या विकासाचा पाया आहे. परंतु आज या शक्तीसमोर उभे असलेले सर्वात मोठे संकट म्हणजे व्यसनाधीनता. दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, ई-सिगारेट, अमली पदार्थ आणि विविध प्रकारची मादक द्रव्ये अनेक तरुणांचे आरोग्य, शिक्षण, करिअर आणि कुटुंब उद्ध्वस्त करत आहेत. त्यामुळे नशामुक्त भारत ही केवळ सरकारी योजना नसून संपूर्ण समाजाची चळवळ बनली पाहिजे.

व्यसनामुळे केवळ एखाद्या व्यक्तीचे नुकसान होत नाही, तर त्याचे दुष्परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजावर होतात. गुन्हेगारी, अपघात, कौटुंबिक हिंसा, आर्थिक संकट, मानसिक ताण आणि आरोग्यावरील प्रचंड खर्च यामागे व्यसन हे प्रमुख कारण ठरत आहे. शिक्षणाच्या वयात जर तरुण व्यसनाच्या आहारी गेले, तर राष्ट्राच्या भविष्यासमोर मोठे प्रश्न निर्माण होतात.

डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे
संपादक

आज सोशल मीडिया, चुकीची संगत, ताणतणाव आणि उत्सुकता यामुळे अनेक विद्यार्थी व्यसनाकडे वळतात. म्हणूनच केवळ कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही. शाळा, महाविद्यालये, पालक, शिक्षक, सामाजिक संस्था, धार्मिक संघटना आणि प्रसारमाध्यमे यांनी एकत्र येऊन जनजागृती करणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा, योग, ध्यान, सांस्कृतिक उपक्रम आणि मूल्यशिक्षण यांचा प्रसार केल्यास त्यांना सकारात्मक जीवनदृष्टी मिळू शकते.

नशामुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतः व्यसनापासून दूर राहण्याची आणि इतरांनाही त्यापासून परावृत्त करण्याची शपथ घेतली पाहिजे. एक व्यक्ती व्यसनमुक्त झाली, तर एक कुटुंब वाचते; एक कुटुंब वाचले, तर समाज सुदृढ होतो; आणि समाज सुदृढ झाला, तर राष्ट्र बलवान बनते.

आजची गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. चला, आपण सर्व मिळून आरोग्यदायी, सुसंस्कृत आणि व्यसनमुक्त भारत घडविण्याचा संकल्प करूया.

नशा सोडा - जीवन जोडा;
व्यसनमुक्त युवा - विकसित भारताचा पाया.





जन गण मन विद्यामंदिर आणि जनगणमन सेकंडरी स्कूल अत्यंत लक्ष देऊन सांभाळणारा आमचा स्टाफ.

नशामुक्त भारत जनजागृती परिसंवाद



प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

जाह्नवीज मल्टी फाउंडेशन यांच्या वतीने, ब्रह्माकुमारीज विश्व आध्यात्मिक विद्यापीठ - मेडिकल विंग यांच्या सहकार्याने आयोजित नशामुक्त भारत या प्रेरणादायी व जनजागृतीपर परिसंवादासाठी आपणास हार्दिक निमंत्रण.

दिनांकः ६ ऑगस्ट २०२६
(गुरुवार)
वेळः सकाळी ११.३० ते १२.३०
स्थळः JMF कॅम्पस, डोंबिवली (प.)

प्रमुख वक्तेः
डॉ. राजकुमार एम. कोल्हे
संस्थापक अध्यक्ष, जाह्नवीस मल्टी फाउंडेशन
शिक्षणतज्ञ, लेखक व संशोधक

परिसंवादातील प्रमुख विषयः
व्यसनांचे दुष्परिणाम समजून घेणे
निरोगी, शिस्तबद्ध व मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा स्वीकार
आत्मविश्वास, सकारात्मक विचार व व्यक्तिमत्त्व विकास
व्यसनमुक्तीसाठी अध्यात्माची प्रभावी भूमिका
नशामुक्त भारत अभियानाचे जागरूक दूत बनणे

जना गण मन इंग्लिश सेकंडरी स्कूल आणि वंदे मातरम् डिग्री कॉलेज मधील सर्व विद्यार्थ्यांनी या महत्त्वपूर्ण जनजागृती कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्यसनमुक्त, निरोगी व सशक्त भारताच्या निर्मितीत आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, ही नम्र विनंती.

जीवनाला होकार द्या, व्यसनाला नकार द्या.

चला, आपण सर्वजण मिळून नशामुक्त भारत घडवूया!

सस्नेह शुभेच्छांसह,
JMF व्यवस्थापन

सहकार्य-
ब्रह्माकुमारीज विश्व आध्यात्मिक विद्यापीठ - मेडिकल विंग
(भारत सरकारच्या नशामुक्त भारत अभियान ला सहकार्य करणारा सामाजिक उपक्रम.)



वंदे मातरम् कॉलेजमधील कर्मचारी वर्ग



जनगणमन मुलांसाठी प्ले ग्रुप आणि प्रायमरी व सी बी एस ई आणि स्टेट बोर्ड मधील कर्मचारी वर्ग.









जाह्नवीज मल्टी फाउंडेशनचा कर्मचारी वर्ग म्हणजे आमचे कुटुंबच

JMF THINK TANK



CHESS COMPETITION PHOTOS



SINGING COMPETITION PHOTOS



पान १ वरुन

हारणे किंवा जिंकणे हे आपल्या हातात नसून फक्त प्रयत्न करणे आपल्या हातात आहे , कोणत्याही स्पर्धेत सहभागी होताना असलेला आत्मविश्वास आणि सहभागी झाल्यावर हृदयात होणारी धडधड ह्या दोन्ही गोष्टी होणे स्वाभाविकच आहे ,म्हणून घाबरून न जाता प्रयत्नांवर विश्वास ठेवून पुढे चाला ,जिंकल्यावर आनंद होतोच पण हरल्यावर सुद्धा वाईट वाटून न घेता पुन्हा आपल्याला एकदा नवीन संधी आणि नवीन मंच उपलब्ध झाला आहे ह्याचा आनंदी विचार ठेवा आणि पुन्हा नव्याने स्पर्धेत उतरून स्वतःला सिद्ध करा असा मोलाचा सल्ला आणि मार्गदर्शन संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना दिले.

बालवयात मनाची पाटी ही कोरी असते , पालक, शिक्षक ज्या प्रमाणे मुलांच्या मनाला आकार देतात त्या प्रमाणे त्या मुलांच्या मनाची जडणघडण होत असते , तू जिंकून आलाच पाहिजे हा अट्टाहास पालकांनी ठेवण्यापेक्षा तुला कोणती गोष्ट करण्यात अधिक आनंद मिळतो आहे याकडे लक्ष देऊन नवीन गोष्ट शिकायला मिळते हे पालकांनी मुलांना इतर कुणाची तुलना न करता समजून सांगायला पाहिजे आहे तरच विद्यार्थ्यांची प्रगती ही अटळ आहे , हाताची पाचही बोटे सारखी नसतात पण त्या प्रत्येक बोटाचे महत्व हे असामान्य आहे तशीच ही आपली मुले देखील आहेत असे विचार सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी मांडले. संस्थापक व सचिव यांनी बुद्धिबळाच्या स्पधेर्ची सुरुवात स्वतः खेळ खेळून करून दिली.

बालवयात होणारे संस्कार ही आयुष्यभराची शिदोरी आहे आणि आपली भारतीय संस्कृती आणि संस्कार ह्याबाबतीत अग्रगण्य आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे गुरुमहर्षी वेद व्यास, यांच्याच संस्काराने आपली भारतीय पिढी नव्याने घडत आहे आणि म्हणूनच त्यांची कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे व्यास पौर्णिमा आणि त्या निमित्ताने केलेले स्पर्धांचे आयोजन . असे खजिनदार जाह्नवी राजकुमार कोल्हे यांनी आपल्या भाषणात सांगितले व सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

बुद्धिबळ स्पर्धेसाठी श्री सहर्ष सोमण आणि श्री एकनाथ चौधरी यांनी परीक्षण केले तर समूह गायन स्पर्धांसाठी श्री सिद्धार्थ कुलकर्णी व सौ श्वेता खांडेकर यांनी परीक्षण केले, थिंक टँक स्पर्धांसाठी श्री.युवराज कोल्हे, सौ. अर्चना शिंगटे, व सौ.मृणाल शिक्षिका यांनी परीक्षण केले तर वेशभूषा स्पर्धा साठी श्री.मयंक मेघांनी मनस्वी खरसेकर यांनी परीक्षण केले.बालनाट्य आणि ऐतिहासिक नाटक यासाठी श्री.भूषण तांबे,नितेश मेस्त्री यांनी परीक्षण केले तर चित्रकला स्पर्धा साठी दीपा तांबे, स्नेहा डोळे, सौ. सपना, सौ. दीपिका यांनी परीक्षण केले.समूह नृत्यासाठी श्री आदेश काळे, दीपा साखरे, आणि भावेश बोमेरा यांनी परीक्षण केले.

स्पर्धेमध्ये जिंकलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे तीन नंबर आणि उत्तेजनार्थ चौथा नंबर काढून चषक, पदक आणि प्रशस्तीपत्रक देण्यात आले. जे एम एफ शिक्षण संस्थेला गेल्याच वर्षी पंचवीस वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने आंतरशालेय शिक्षकांना देखील पंचवीस वषार्ची आठवण म्हणून पदक देण्यात आले.तर सर्व स्पर्धांमध्ये सर्वात जास्त शाळा सहभागी झालेल्या रॉयल इंटरनेशनल शाळेला चषक देण्यात आले तर सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले, त्याचबरोबर बिस्किटांचे ही वाटप करण्यात आले.

जे एम एफ मंडपम मध्ये पालकांनी स्टॉल लावून खाद्यपदार्थांची रेलचेल होती, सर्व पालक विद्यार्थी शिक्षकांनी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला.

जे एम एफ कला शिक्षण संस्थेचे कलात्मक शिक्षक सौ.श्रेया कुलकर्णी, अभिषेक देसाई, श्री.प्रमोद पगारे, सौ.वैशाली शिंदे, श्री.रमेश वागे, दीपाली सोलकर, सौ. स्नेहा डोळे, सौ.सपना, ,दीपा तांबे तसेच मुख्याध्यापिका ज्योती व्यंकटरमण, तेजावती कोटीयन, उप मुख्याध्यापिका सौ.मयुरी खोब्रागडे ,सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य करून जे एम एफ गुरुपौर्णिमा सप्ताह आनंदाने पार पाडला तर ध्वनी व्यवस्थासाठी संकेत कुपाटे, तेजस पाटील, आकाश, सौ.निमा शिक्षिका तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले,तर आयोजित सर्व स्पर्धांचे फोटो व्हिडीओ काढण्याची जबाबदारी अखिल नायडू, ओम तांदूळकर, जय लाखारा, निखिल शिंदे यांनी पार पाडली तर जन गण मन इंग्रजी माध्यमिक शाळा आणि विद्यामंदिर चे वर्ग प्रतिनिधी, आणि इच्छुक विद्यार्थ्यांनी आठवडाभर स्वेच्छेने सहकार्य करून आपल्या कामाची पावती मिळवली.

FASHION SHOW COMPETITION



DRAMA COMPETITION PHOTOS









गणित विषय संबंधित ' मॅथ्स सर्कल ' या उपक्रमाच्या पाचव्या वर्षाच्या शुभारंभ





राष्ट्रीय शिक्षण संस्था , रेझिंग ए मॅथेमॅटिशियन फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटी यांच्या संयुक्त विद्यामाने शालेय विद्यार्थ्यांसाठी गणित विषयासंबंधित 'मॅथ्स सर्कल' या उपक्रमाच्या पाचव्या वर्षाचा शुभारंभ नुकताच संस्थेच्या डॉक्टर हेडगेवार सभागृह, राणाप्रताप भवन येथे संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटी चे अध्यक्ष श्री.प्रसाद खोत हे उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय कुलकर्णी व मॅथ्स सर्कल उपक्रमाच्या समन्वयक आणि संस्था उपाध्यक्षा डॉ.सौ. सरोज कुलकर्णी, कार्यवाह श्री. शिरीष फडके, कोषाध्यक्ष श्री. संजय दीक्षित, रेझिंग ए मॅथेमॅटिशियन फाउंडेशनच्या सौ. वृषाली नायर , रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटीचे श्री.संतोष नंबुद्री सौ. बिंदू नंबुद्री ,श्री. मुकेष सोनवणे,श्री. श्रीजित पुथेन आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थाध्यक्ष डॉ.संजय कुलकर्णी यांनी म्हटले की लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व या उपक्रमाची सुरुवात हा एक अनोखा योगायोग आहे. लो. टिळकांचा गणित हा आवडता विषय होता. बुद्धीचा कस वाढविण्यासाठी हा उपक्रम सुरू केला आहे. रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटी यांचे सहकार्य व रेझिंग मॅथेमॅटिशन ची टीम यांच्यामुळेच हे शक्य झाले. या उपक्रमा मुळे मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच जिद्द, चिकाटी, सर्जनशील विचारांची देवाणघेवाण होते.यातूनच पुढे गणितज्ञ होण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी मॅथ्स सर्कल उपक्रमाच्या समन्वयक डॉ. सौ. सरोज कुलकर्णी यांनी मॅथ्स सर्कल हा उपक्रम वर्षभर कशा पद्धतीने घेतला जातो याची माहिती दिली. पालकांच्या सहकायामुळे हा उपक्रम पुढे जात आहे असेच सहकार्य देऊन विद्यार्थ्यांना दर शनिवारी या उपक्रमासाठी पाठवावे. यातूनच विद्यार्थ्यांची प्रगती होणार आहे.

रेझिंग अ मॅथेमॅटिशन या संस्थेविषयी माहिती सौ. वृषाली नायर यांनी दिली. आपल्या देशामध्ये मराठी शाळेमध्ये घेतला जाणारा हा पहिलाच उपक्रम आहे.गणित शिकण्यासाठी संयम बाळगावा लागतो. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना नवीन प्रश्न कसे सोडवायचे याची क्षमता विकसित होण्यास मदत होणार आहे. यापुढे विद्यार्थ्यांनी दरवर्षी होणाऱ्या निवासी मॅथ्स शिबिरांमध्ये सहभागी व्हावे. यातूनच ऑलिंपियाड सारख्या परीक्षांना देखील बसता येईल असे सौ.नायर मॅडम म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व रोटरी लब ऑफ डोंबिवली सिटी चे अध्यक्ष श्री.प्रसाद खोत यांनी मुलांमधील गणितज्ञ शोधण्याचे काम या दोन संस्था करीत असून त्याला आपले संपूर्ण सहकार्य आहे. जिथे गरज आहे तिथे रोटरी आपले सहकार्य करणारच आहे. देशामध्ये होणाऱ्या निवासी गणित शिबिरांसाठी जर विद्यार्थ्यांना जायचे असेल तर त्यांचा प्रवास खर्च देखील उचलण्याची आपली तयारी आहे असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी गुजरात येथील दिशादर्शक स्तंभाचे उदाहरण दिले.

कार्यक्रमाला रेझिंग अ मॅथेमॅटिशन संस्थेचे सर्व शिक्षक उपस्थित होते. सहसंस्थापक श्री. विनय नायर यांचा मुलगा, चि.श्रीराम नायर व शिक्षक श्री. श्रीपाद तांबेसर यांचा मुलगा , चि.धृपद तांबे या दोघांचे गणितातील कामगिरीबद्दल कौतुक करण्यात आले.

संस्थेचे माजी अध्यक्ष व सदस्य डॉ. सुभाष वाघमारे, संस्था सदस्य श्री.विवेक पुराणिक, श्री.प्रकाश म्हात्रे , सौ. मीरा कुलकर्णी यांसह सर्व शाळांचे मुख्याध्यापक,शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्मिता माहेगावकर यांनी केले. स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दत्तनगर माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. यावेळी पालक ,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते .

पुणे विद्यापीठात बनावट बी.कॉम. पदवीप्रकरण तापले;

विद्यार्थ्यांचे तीव्र आंदोलन....

पुणे (प्रतिनिधी) - (Pune University fake B.Com degree) पदव्या घोटाळ्याने एकच खळबळ उडवली आहे. नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय), अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती व अन्य विद्यार्थी संघटनांनी एकत्रित येऊन विद्यापीठ प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला. विद्यार्थ्यांनी प्रशासनाला धारेवर धरत संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी (Pune University employees demand action) केली. या प्रकरणात गुणवंत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत असल्याचे मत व्यक्त करत आंदोलकांनी (Pune University Student Movement) प्रशासनाकडून स्पष्ट उत्तरांची मागणी केली. आंदोलनादरम्यान विद्यार्थी संघटनांनी अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. यामध्ये प्रकरणातील सर्व दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी., प्रभारी कुलसचिवांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा., परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालकांनी तात्काळ राजीनामा द्यावा, तसेच वित्त व लेखा विभागातील मुख्य कर्मचारी व विभागप्रमुखांवर कारवाई करून स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,डॉ.राजकुमार मा.कोल्हे यांनी जागृती प्रिटींग प्रेस,बी-१०१,भायखळा सर्विस इंडस्ट्रीयल इस्टेट,डी.के.क्रॉस रोड,भायखळा,मुंबई-४०००२७.येथे छापून ५०१,गोपी मॉल रेसिडेन्स,एनएसएस रोड,डोंबिवली (प.),ठाणे,महाराष्ट्र - ४२१२०२.येथुन प्रकाशित केले.संपादक : डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार कोल्हे,
भ्रमणध्वनी :८४५२००५१९८/९२२१४३७४१४ ईमेल : RNI No.: MHMAR/26/A2042

Printed, Published And Owned By. Dr. Rajkumar M. Kolhe, Printed At Jagruti Printg Press, B-101, Byculla Service Industrial Estate, D. K. Cross Road, Byculla, Mumbai - 400027, and Published From 501, Gopi Cine Mall Residence, NSS Road, Dombivli West, Thane, Maharashtra.- 421202
Editor : Dr.Mrs.Prerna R.Kolhe, Mobile : 8452005198,Email :www.mahavidyalaykhabarbat.in, RNI No.:- MHMAR/26/A2042